EAU/ICD/2021-22/190
dt. 20/9/21

मसुदा
क्र.५/२०२१–२०२२

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२०२२ मधील १२ ऑगस्ट, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पाचवी सभा **गुरूवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयेजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणापासून बचाव करण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४ | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३ | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४. | डॉ. सोनाली रोडे, सहसंचालक, मुंबई विभाग | सदस्य |
| १५. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १६. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १७. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत:-**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३० (४) (ड) अन्वये डॉ. सोनाली रोडे, सहसंचालक, मुंबई विभाग यांचे प्रथम बैठकीत स्वागत करण्यात आले.

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **अनुपस्थिती :-**

डॉ. बी.एन. जगताप यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

• **श्रध्दांजली:-**

## डॉ. प्र. ल. गावडे

ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी सचिव डॉ. प्र. ल. गावडे यांचे दीर्घ आजाराने दिनांक ०१ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ९७ वर्षांचे होते.

## श्री. रशीद इराणी

प्रसिध्द चित्रपट समीक्षक श्री रशीद इराणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०१ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ७४ वर्षांचे होते.

## श्री. सिद्रामप्पाना आलुरे

मराठवाडयातील ज्येष्ठ शिक्षण महर्षी आणि माजी आमदार श्री. सिद्रामप्पाना आलुरे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०२ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ९० वर्षांचे होते.

## श्री. शिवशंकरभाऊ पाटील

शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानाचे व्यवस्थापकीय विश्वस्त श्री. शिवशंकरभाऊ पाटील यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०४ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८२ वर्षांचे होते.

## श्री. विलास सोनवणे

परिवर्तनवादी चळवळीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले ज्येष्ठ कार्यकर्ते मार्क्सवादी विचारवंत कॉम्रेड श्री. विलास सोनवणे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०४ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ६८ वर्षांचे होते.

## श्री. सुभाष राठी

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या वाशीम अर्बन बँकेचे मानद अध्यक्ष तसेच, राजस्थान शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. सुभाष राठी यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०८ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षांचे होते.

## प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे

संत साहित्याचे गाढे अभ्यासक आणि ज्येष्ठ साहित्यक प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०८ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ७७ वर्षांचे होते.

## श्री. सखाराम पवार

माजी मंत्री तथा बहुजन महासंघाचे संस्थापक श्री. सखाराम पवार यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०८ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८४ वर्षांचे होते.

## श्री. अनुपम श्याम

ज्येष्ठ अभिनेते श्री. अनुपम श्याम यांचे दीर्घ आजाराने दिनांक ०८ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ६३ वर्षांचे होते.

## डॉ. बालाजी तांबे

हजारो वर्षांनी समृध्द परंपरा असलेल्या आयुर्वेद, योग आणि संगीतोपचाराच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयुष्य वेचणारे प्रसिध्द आयुर्वेदाचार्य डॉ. बालाजी तांबे यांचे वृध्दापकाळाने दिनांक १० ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८१वर्षांचे होते.

# (कार्यसूची)

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक २९ जुलै, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| **ठराव** | दिनांक २९ जुलै, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २ | विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६मधील कलम ३७ (झ) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता वार्षिक बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| **ठराव** | वार्षिक बृहत आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७(झ) अन्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ठ "अ" प्रमाणे विद्यापरिषदे पूढे ठेवण्याची शिफारस करण्यात आली असून व्यवस्थापन परिषदेने ठाणे जिल्हयातील कल्याण येथे कला महाविद्यालय सुरू करण्यासाठी बिंदू देण्यात आला असून एकूण ७४ बिंदू व्यवस्थापन परिषदेने मान्य केले आहेत. डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी यासंदर्भात आपली असहमती नोंदविली. | |
| | आयत्यावेळी आलेली बाब | |
| बाब क्र. ३ | मा. कुलगुरू यांनी नुकत्याच पार पडलेल्या ऑलिंपिक स्पर्धांमध्ये सुवर्ण, रजत आणि कांस्य पदक प्राप्त केलेल्या सर्व भारतीय खेळाडूंचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडला. | कुलसचिवांचे कार्यालय |
| **ठराव** | मा. कुलगुरू यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. विद्यापीठातर्फे मा. कुलगुरूंच्या स्वाक्षरीने पत्र पाठविण्याबाबतच्या सूचना मा. कुलसचिवांना देण्यात आल्या. | |

सभेच्या शेवटी मा. कुलगुरू व मा. प्र-कुलगुरू यांनी सभागृहास दि. २४, २५, २६ ऑगस्ट, २०२१ रोजी विद्यापीठास भेट देणा-या नॅक समितीच्या तयारीच्या अनुषंगाने अवगत केले व सर्वांना त्या दरम्यान सहकार्य करण्याचे आवाहन केले.

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव

प्रभारी कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू